**केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९**
**च्या नियम १२५(ई) ची अंमलबजावणी**
**तसेच प्राण्यांच्या वाहतूकी संदर्भात**
**तपासणी करणेबाबत..**

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकिय इमारत, ३रा व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

क्र.एमव्हीपी-०२९२/सीआर-२१२२(ब)/का.२(३) 10981 दिनांक - 19 AUG 2019

वाचा : १) केंद्र शासन अधिसूचना क्र.जी.एस.आर.५४६(ई), दि.०८/०७/२०१५.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीपी-०२९२/सीआर-२१२२(ब)/का.२(३)/जा.क्र.११८१५, दि.१५/१०/२०१५.
३) केंद्र शासन अधिसूचना क्र.जी.एस.आर.१३२९(ई), दि.०५/०४/२०१६.
४) केंद्र शासन अधिसूचना क्र.जी.एस.आर.९०४(ई), दि.२३/०९/२०१६.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीपी-०२९२/सीआर-२१२२(ब)/का.२(३)/जा.क्र.२३९५, दि.१०/०२/२०१७.
६) या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-०९१७/सीआर-४७५/का.२(३)/जा.क्र.५६३५, दि.१०/०५/२०१९.
७) क्रिमीनल जनहित याचिका क्र. ३३/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.२५.०३.२०१९, दि. ०५/०८/२०१९ व दि. ०६/०८/२०१९ रोजीचे आदेश.
८) The Prevention of Cruelty to Animals Act, 1960.
९) The Transport of Animals Rules, 1978.
१०) The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001.
११) IS 14904:2007, Indian Standard Transport of livestock- Code of Practice.
१२) IS-5238:2001, Transport of Poultry- Code of Practice.
१३) IS-5236:1982, Code for Transport of Pigs by Rail and Road.
१४) परिवहन आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक क्र. बकरी ईद/पआका/२(अ)(६)/२०१९/जा.क्र.१०५९०, दि. ०५.०८.२०१९

## परिपत्रक

सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

१) उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या केंद्र शासन अधिसूचना दिनांक ०८.०७.२०१५ अन्वये केंदीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५-ई समाविष्ट केला असुन तसे संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. उक्त नियम दिनांक ०१.१०.२०१६ पासून अंमलात आणण्याबाबत केंद्र शासनाने संदर्भ क्र. ३ ची अधिसूचना जारी केली. संदर्भ क्र. ४ च्या अधिसूचनेंन्वये उक्त नियमात सुधारणा करण्यात आली असुन तसे संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.



Scanned by CamScanner

२) जनावरांच्या वाहतुकीकरीता वाहनांमध्ये करावयाच्या अनुषंगिक बदलांकरीता उक्त नियम १२५-ई लागू करण्यात आले असून त्याअंतर्गत मोटार वाहन बांधणीमध्ये करावयाचे बदल तसेच त्यातून होणारी जनावरांची लागू असलेल्या मानकांनुसार करण्यात यावी असे नमूद आहे.

३) प्रत्येक जनावराकरीता पक्या विभाजकासह स्वतंत्र जागा असावी. तसेच उक्त तरतूदीनुसार ज्या प्रकारच्या जनावरांच्या वाहतूकीकरिता Special License देण्यात येईल त्याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. उदा.:- जसे गाई-म्हशी / बकऱ्या-मेंढ्या / डुकरे / घोडे / कोंबड्या इ. यापैकी एक प्रकार.

४) उक्त नमुद The Prevention of Cruelty to Animals Act, 1960, The Transport of Animals Rules, 1978 व The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 येथील कायदा व नियमांच्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनावरांची वाहतूक संबंधीत वाहतूकदारास करता येणार नाही तसेच उक्त तरतूदींचे पालन न केल्यास संबंधित कायदे नियमातील तरतूदीनुसार संबंधित वाहतूकदार कारवाईस पात्र ठरतील याचा स्पष्ट उल्लेख करावा.

५) जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनातून इतर मालवाहतूकीस परवानगी देण्यात येवू नये.

६) उक्त नियमाच्या तरतूदीनुसार वाहनामध्ये आवश्यक ते बदल केल्यानंतर संबंधित उप / प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेद्वारा Special License देण्यात येतील.

७) शेतकऱ्यांच्या मालकीच्या जनावरांच्या वाहतुकीकरीता सदर नियम लागू असणार नाहीत.

८) जनावरांची वाहतूक करण्याकरीता ज्या वाहनांस यापूर्वी अन्य नियमांतर्गत अशी परवानगी जारी केली असेल त्या वाहनांना देण्यात आलेली परवानगी तात्काळ रद्द करून केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५-ई च्या तरतूदीप्रमाणे वाहनात बदल करुन Special License जारी करावेत अशा आशयाच्या सुचना या कार्यालयाच्या संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये या पूर्वीच जारी करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी प्राप्त झालेले अर्ज त्यानुसार जारी केलेले Special Licenses व अशी परवानगी नाकारलेली वाहने या बाबत स्वतंत्र अभिलेख टेवावेत.

सर्व उप / प्रादेशिक परिवहन अधिकारी, तसेच प्रभारी, सिमा तपासणी नाका यांना सुचित करण्यात येते की जनावरांची अवैध वाहतूक होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेउन खालीलप्रमाणे कडक अंमलबजावणी करण्यात यावी व या बाबत कार्यालयात स्वतंत्रपणे अभिलेख जतन करावा.

१. सक्षम जनावरांची वाहतूक करताना वाहन रस्त्यावरती आढळल्यास मोटार वाहन अधिनियम व नियमातील तरतूदीचे पालनाबाबत तपासून उक्त वाहनास केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५-ई प्रमाणे Special Licenseप्राप्त केले आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करावी त्यासह The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 च्या नियम ९६ च्या तरतूदीन्वये केंद्र व राज्य शासनाच्या समविषयांकीत कायदे व नियमांचे पालन करुन सदर वाहनातून जनावरांची वाहतूक होत असले बाबतच्या पडताळणीअंती सक्षम प्राधिकरण तथा Animal Welfare Board of India यांनी तसेच केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी वा व्यक्ती वा प्राणी कल्याण संस्था यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत तपासावी.

   असे प्रमाणपत्र जारी केले नसल्यास जनावरांच्या वाहतूक करण्यास वाहतूकदाराने नकार देणे अपेक्षीत आहे.

२. The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 च्या नियम ९६ प्रमाणे सक्षम प्राधिकरण यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्राशिवाय वाहतूकदाराने जनावरांची वाहतूक केल्याचे निदर्शनास आल्यास मोटार वाहन अधिनियम व नियमांतर्गत तरतूदीप्रमाणे केलेल्या कारवाईअंती अशी वाहने



Scanned by CamScanner

**सोडून न देता,** The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 च्या नियम ९७ अन्वये पुढील कार्यवाही करिता सदर वाहने संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीसांकडे सुपूर्द करण्यात यावीत.

३. उक्त नियमाच्या नियम ९८ मध्ये जनावरे वाहतूकी संबंधीच्या सर्वसाधारण शर्ती नमुद करण्यात आल्या आहेत.

४. राज्यात विविध टिकाणी प्राणी कल्याण अधिकारी / संस्था नेमण्यात आले असून त्यांनी प्राण्यांची अवैध वाहतूक रोखण्याकामी मदत मागितल्यास त्यांना मदत करण्यात यावी. सदर कामी शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. तसेच या संदर्भाने या कार्यालयाने पुर्वी जारी केलेल्या सुचनांचे पालन होईल हे पहावे.

५. या संदर्भात आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाही संकेत स्थळावर प्रदर्शीत करावयाची असल्याने संबंधीत माहिती अभिलेखीत करुन परिवहन उपायुक्त (अंमल.-२) यांच्याकडे प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत न चुकता सादर करावी.

उपरोक्त सर्व कायद्यातील तरतूदी बाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व वाहतूकदारांना विशेषत: जनावरांची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहतूकदारांना याबाबतची माहिती आपल्या स्तरावरुन प्रसिध्दी पत्राद्वारे देण्यात यावी. (प्रारुप प्रत संलग्न). तसेच उक्त तरतूदींबाबत तसेच नियमांचे पालन न केल्यास होणाऱ्या परिणामांबाबत आपल्या कार्यक्षेत्रात तसेच सीमा तपासणी नाक्यांवर फलक लावून प्रसिध्दी देण्यात यावी.

(परिवहन आयुक्त यांचे मान्यतेने)

(अ.ना. भालचंद्र)
परिवहन उपायुक्त (उ.श्रे)
(अंमलबजावणी-१)
महाराष्ट्र राज्य, मुवई.

**प्रति,**

१. सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२. परिवहन उपायुक्त (संगणक) यांना सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता अग्रेषित.
३. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना संदर्भ क्र. ७ मध्ये नमुद दि. ०६.०८.२०१९ च्या न्यायालयीन आदेशाच्या प्रतीसह उचीत कार्यवाहीस्तव सादर.
२. पोलीस आयुक्त, मुंबई यांना उचीत कार्यवाहीस्तव सादर.
३. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), यांना उचीत कार्यवाहीस्तव सादर.
४. आयुक्त, पशुसंवर्धन, पशुसंवर्धन विभाग, औंध, पुणे-७ यांना माहितीसाठी सादर.
५. Animal Welfare Board of India, यांना ई-मेल द्वारे माहितीस्तव. rmkawbi@yahoo.co.in ; awbi@md३.vsnl.net.in (www.awbi.org)

प्रत सादर,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२.

प्रत सादर,

प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय मुंबई-३२.



Scanned by CamScanner

# प्रसिध्दी पत्रक

जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांस व जनतेस एतद्वारे कळविण्यात येते की, जनावरांची वाहतूक करण्यापूर्वी आपल्या वाहनांमध्ये केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५-ई च्या तरतूदी नुसार वाहनांच्या बांधणीमध्ये सुयोग्य बदल करून आपल्या वाहनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करून Special License प्राप्त करून घ्यावे.

The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 च्या नियम ९६ च्या तरतूदींनुसार वाहनातून जनावरांची वाहतूक करतांना वाहतूकदाराने सक्षम प्राधिकरण तथा Animal Welfare Board of India यांनी तसेच केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी वा व्यक्ती वा प्राणी कल्याण संस्था यांनी जारी केलेले प्रमाणपत्र सोबत बाळगावे.

उक्त नमुद प्रमाणपत्र जारी केले नसल्यास जनावरांच्या वाहतूक करण्यास वाहतूकदाराने नकार देणे अपेक्षित आहे.

तसेच, The Prevention of Cruelty to Animals Act, 1960, The Transport of Animals Rules, 1978 व The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules, 2001 या कायदा व नियमांच्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनावरांची वाहतूक करण्यात येऊ नये. उक्त तरतूदींचे पालन न केल्यास संबंधित कायदे नियमातील तरतूदीनुसार संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

-------------------X------------------



Scanned by CamScanner